Vol. 1, Issue II / March 2011, pp.134-138

Research Paper - Sociology

ISRJ

# जागतिकीकरण आणि महिला सबलीकरण

– प्रा. डॉ. अनिल पी. जैन

**प्रस्तावना :–**

मागील दोन दशकापासून जागतिकीकरणाचे वारे सर्वत्र वाहत आहे जागतिक आणि स्थानिक असा भेद नष्ट करून संपूर्ण जगाला एकत्र आणण्याचा हा प्रयत्न आहे. सर्व साधारणपणे जागतिकीकरण ही उत्पादने (Product) सेवा (Service) भांडवल (Capital) लोक (People) माहिती आणि संस्कृती (Information) यांच्या सीमापार (Cross border) वाढत्या प्रभावाला दर्शविणारी संकल्पना आहे.

जागतिकीकरण ही विविध पातळ्यांवर लोकांमधील तसेच राष्ट्रा–राष्ट्रामधील संबंध वाढविणारी प्रक्रिया (Process) आहे. संपूर्ण जगात सन 1991 पासून उदारीकरण (Librallazation) खासगीकरण (Privetalization) आणि जागतिकीकरण (Globalization) या तीन प्रक्रियांनी वेग पकडला आहे. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय पातळी वर सहकार्य वाढल्याचे दिसत आहे. शीत युध्दाचा शेवट आर्थिक संबंधाना प्राप्त झालेले प्राधान्य माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात घडून आलेली क्रांती विश्व व्यापार संघटना तसेच विविध व्यापारी संघाची झालेली निर्मिती यामुळे एका विश्व संस्कृतीच्या तसेच विश्व आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेच्या निर्मितीच्या दिशेने प्रयत्न होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे लोकांमधील अंतर कमी होऊन विश्वग्राम (Gobal Village) ही संकल्पना आकाराला येत आहे.

**जागतिकीकरणाच्या व्याख्या :–**

अनेक विचारवंतानी जागतिकीकरण या संकल्पनेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रसिध्द विचारवंत ॲन्थोनी गिडीग्सच्या मतानुसार Globalization is the process of compression of time and space beyond nation & state तसेच दिपक नायर यांच्या मतानुसार ''जागतिकीकरण म्हणजे राष्ट्र–राज्याच्या राजकीय सीमा ओलांडून विस्तारीत झालेले आर्थिक क्रियाकलाप होय''.

योगेंद्रसिंह यांच्या मते ''भारतीय समाजात जागतिकीकरणानंतर क्रांतीकारी परिवर्तन सुरू झाले जागतिकीकरण ही मुलतः आर्थिक प्रक्रिया आहे पण या प्रक्रियेचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, पर्यावरण आरोग्य अशा अनेक घटकांवर परिणाम झाला आहे.

**महिला सबलीकरणाचा अर्थ :–**

भारताला स्वातंत्र्य मिळून 61 वर्ष पूर्ण होत आहेत तथापि स्वातंत्र्याच्या कायद्यापासून भारतीय समाजातील महिला सारखा मोठा गट आजही वंचित आहे. सभ्यतेच्या विकासाच्या काळात जगात मातृसत्ताक व्यवस्था होती परंतु नंतरच्या काळात समाज मातृसत्ताक व्यवस्थेकडून पितृसत्ताक व्यवस्थेकडे आला ज्याचा प्रभाव निश्चितच स्त्रियांच्या स्थिती आणि दर्जावर पडला तेंव्हा पासून आधुनिक युगापर्यंत भारतासारख्या परंपरागत देशात एक चाकोरीबध्द जीवन स्त्रियांना जगावे लागले आहे.

स्त्री सबलीकरण या शब्दाची फोड केल्यास सबलीकरण म्हणजे दुर्बलता नष्ट करणारी संकल्पना आज ही गतिमान बनली आहे. स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्री पुरूष समानतेचा स्विकार करणे होय. स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने विकासाची संधी देणे तिच्यात

स्वतःची जाणीव निर्माण करणे, सामाजिक, आर्थिक व राजकिय क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने समता प्रस्थापित करणे जे भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत आहे. स्त्री सबलीकरणाची संकल्पना सर्वप्रथम पावलीफिरे यांनी उपयोगात आणली. अबला महिलांना सबला करणे आणि त्यांना समान हक्क व संधी देणे हाच या संकल्पनेमागचा उद्देश आहे. लिंगभेदावर आधारीत समाज व्यवस्था नष्ट करून नवीन समाज रचना निर्माण करणे, सत्ता आणि संधी पासून वंचित महिलांना कोणत्या ही भेदभावाशिवाय प्रगती करण्याची संधी देणे या संकल्पनेत अभिप्रेत आहे.

**महिला सबलीकरणाची आवश्यकता :–**

महिला सबलीकरण आज जागतिक समाजाची गरज आहे. महिलांचे सबल होते व्यक्ति, कुटूंब, समाज तसेच राष्ट्रासाठी अत्यंत आवश्यक आहे एक आई म्हणून एका स्त्रीचे अनन्य साधारण असे महत्व आहे. महिलांचे महत्व आणि त्यांचा समाजात असलेला दर्जा लक्षात घेवून 1975 ते 1985 हे महिला विकासाचे दशक म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केले तसेच 1975 हा वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. 1995 मध्ये चौथी जागतिक महिला परिषद बिजिंग (चीन) या ठिकाणी झाली यात महिला सबलीकरणवर लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. भारतीय राज्य घटनेची कलम 16 मध्ये स्त्री पुरूष समतेची तरतूद करण्यात आली आहे. तसेच 73 आणि 74 व्या घटना दुरूस्तीने महिलांना पंचायत राज व्यवस्थेत आरक्षण मिळाले परिणामी महिला सबलीकरणला नवीन दिशा प्राप्त झाली.

महिलांसाठी जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर वेळोवेळी सकारात्मक प्रयत्न करण्यात आले परंतु या प्रयत्नांना अपेक्षित असे यश आले नाही भारतीय स्त्री ही सामाजिक न्यायापासून वंचित आहे तिच्यावर वेगवेगळ्या प्रकारे अन्याय होत आहे 2001 साली प्रकाशित झालेल्या U.N.O. अहवालावरून भारतीय महिलांना किती सामाजिक न्याय मिळतो ? त्या किती स्वतंत्र आहेत याचे मुल्यांकन करण्यात आले. भारतात दर हजारी पुरूषांमागे महिलांचे प्रमाण घसरत जाऊन 2001 मध्ये 933 होते. महिलांना समान वागणूक मिळाली असती तर 100 कोटीच्या लोकसंख्येत 52 कोटी 80 लाख महिला राहिल्या असत्या परंतु प्रत्यक्षात 2001 साली महिलांची संख्या 49 कोटी 60 लाख होती भारतात 3 कोटी 20 लाख महिला जन्माला यायला हव्या होत्या म्हणजे 3 कोटी 20 लाख महिला गायब झाल्या. ही स्थिती अमानवीय असून महिलांना सामाजिक न्यायापासून वंचित करणारी व त्यांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह लावणारी स्थिती आहे म्हणून महिला सबलीकरण काळाची गरज आहे.

**जागतिकीकरणाचा भारतीय महिलांवर सकारात्मक प्रभाव :–**

जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग संकुचित झाले आहे याच्या प्रभावाने भारतीय समाजातील कुटुंब, विवाह, जात, धर्म, सामाजिक मूल्य, सामाजिक संबंध, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय जीवनात आमुलाग्र असे बदल घडून आले आहेत. सर्वात महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे भारतीय महिलांच्या स्थितीत बदल झाला आहे.

**महिलांची कौटुंबिक स्थिती आणि जागतिकीकरण :–**

भारतीय समाजाने स्त्रीचे अस्तित्व पूर्णपणे स्विकारले नाही कुटुंबात तिचे स्थान चूल, मूल आणि कुटुंबियांची सेवा करण्याएवढेच होते परंतु आज स्त्री स्वातंत्र्य, स्त्री समानता, स्त्री स्वावलंबन ह्या गोष्टी निर्मित झाल्या आहेत त्यामुळे अनेक स्त्रियांचा दर्जा उन्नत होत आहे या साठी शिक्षण प्रसार, विभक्त कुटूंब पध्दती, औद्योगिकीकरण, समाज सुधारकांचे प्रयत्न विशेष बाब म्हणजे जागतिकीकरण कारणीभूत आहे. 1990 नंतर जेंव्हा भारतात जागतिकीकरणाला वेग आला तेंव्हा महिलांच्या कौटुंबिक दर्जात आमूलाग्र बदल घडून आले. याचा आढावा खालील प्रमाणे आहे.

- जागतिकीकरणामुळे महिलांना आपल्या हक्काची जाणीव झाली त्यांना कुटुंबाचा प्रमुख सदस्य म्हणून मान्यता मिळाली.

- महिलासाठी शैक्षणिक विकासाचे व्दार खुले झाले.
- कुटुंबातील महत्वपूर्ण निर्णय, कौटुंबिक कार्य व विवाह विषयक कार्यात महिलांच्या मताला मान्यता मिळाली आहे.
- कुटुंबाचा आकार छोटा असल्यामुळे मुला मुलीं मध्ये भेद करण्याचा दृष्टीकोन बदलला आहे.
- आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी कुटुंबात आशादायी वातावरण निर्माण झाले आहे.
- महिला, समाज आणि कुटुंबाचा आवश्यक आणि महत्वाचा भाग आहे. त्यांना ही चांगले जीवन जगण्याचा अधिकार आहे अशी विचारसारणी निर्माण झाली आहे.
- महिलांच्या व्यक्ति स्वातंत्र्यात वाढ झाली आहे, शिक्षण, विवाह, रोजगार या बाबतीत त्यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळू लागले आहे.
- दळणवळण व संचार साधनांमुळे महिलेचा बाह्य जगाशी परीचय झाला परिणामी त्यांच्यात नवीन आत्मविश्वास निर्माण होऊन आपण ही पुरूषाइतकेच महत्वाचे आहोत याची जाण त्यांना झाली आहे.
- कुटुंबात त्यांच्या आरोग्यावर आधीपेक्षा जास्त लक्ष दिले जात आहे. त्या स्वतः आपल्या आरोग्याची काळजी घेतांना दिसत आहे.
- शरीर सौंदर्य, स्वच्छता, निटनेटकेपणा या बाबत महिला जागृत झाल्या आहेत. आधुनिकतेच्या प्रभावामुळे त्यांच्या राहणीमानात मोठा सकारात्मक बदल आला आहे.
- यौन संबंधी दृष्टिकोणात सकारात्मक बदल झाले आहे.

<u>महिलांची शैक्षणिक स्थिती आणि जागतिकीकरण</u> :–

जागतिकीकरणामुळे स्त्री शिक्षणात आमुलाग्र असा बदल झालेला दिसून येत आहे. स्त्री शिक्षणात झालेली वाढ खालील तक्त्यावरून सिध्द होते.

| वर्षे | टक्केवारी |
|---|---|
| 1950 | 10.9 % |
| 1960 | 16.2 % |
| 1970 | 21.9 % |
| 1997 | 36.7 % |
| 2002.03 | 40.05 % |

- जागतिकीकरणामुळे स्त्रीयांसाठी ज्ञानाची सर्वच क्षेत्र खुली झाली.
- स्त्री शिक्षणामुळे महिला कामगारांची संख्या आणी क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले.
- जागतिकीकरणामुळे कौशल्यप्राप्त स्त्रीयांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली कौशल्या बरोबर त्यांचा ज्ञानाचा विस्तारही झाला.
- बुध्दीवादी स्त्रीशक्ती तयार झाली.
- शिक्षणामुळे स्त्री ही स्वावलंबी आणि स्वनिर्णयक्षम असलेली दिसून येत आहे.
- विद्यापीठ स्तरावर महिलांच्या संख्येत वाढ होत आहे तसेच शैक्षणिक प्रगतीचा दर पुरूषां पेक्ष महिलांचा जास्त दिसून येत आहे. अनेक विद्यापीठात स्त्री विषयक अभ्यासक्रम सुरू झाले आहे.
- जागतिकीकरणामुळे शिक्षण घेण्यासाठी लिंगभेद मान्य नाही ही बाब समोर आली आहे.
- स्त्री पुरूष साक्षरता दराचे अंतर दिवसेंदिवस कमी होत चालले आहे हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

| वर्ष | पुरूष साक्षरता | स्त्री साक्षरता |
|---|---|---|
| 1951 | 27.2 % | 8.9 % |
| 1961 | 40.4 % | 15.3 % |
| 1971 | 46.07 % | 22 % |
| 1981 | 56.5 % | 29.5 % |
| 1991 | 64.1 % | 39.3 % |
| 2001 | 75.8 % | 52.1 % |

<u>महिलांची आर्थिक स्थिती आणि जागतिकीकरण</u> :–

- जागतिकीकरणामुळे महिलांचा मोठा वर्ग आर्थिक क्षेत्रात सक्रिय झाला आहे. तसेच त्यांच्यासाठी समाजाचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे.
- महिला आपल्या शिक्षणाच्या बळावर नवीन नवीन कार्यक्षेत्र काबीज करीत आहे जे आर्थिक कार्य अगोदर पुरूष प्रधान होते त्यात ही आता महिला कार्य करू लागल्या आहेत. विशेष म्हणजे त्यांना समाजाचीही मान्यता मिळू लागली आहे.
- महिलांची आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे त्यांचा दर्जा आपल्या कुटूंबात वाढला आहे तसेच त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली आहे.
- अनेक महिला औद्योगिक क्षेत्रात मोठ मोठ्या पदांवर कार्यरत असल्याचे सर्वत्र दिसून येत आहे.
- महिलांमध्ये आत्मविश्वास आपले मत व्यक्त करण्यासाची क्षमता, निर्णय क्षमता, शिकण्याची जिज्ञासा इत्यादी निर्माण झाले आहे.
- शासनाचे शैक्षणिक धोरण तसेच बचत गट यासारख्या योजनांमुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक परिवर्तन होत आहे.
- बाजार व आर्थिक क्षेत्राचे ज्ञान महिलांना झाले आहे.

<u>राजकीय क्षेत्र, महिला आणि जागतिकीकरण</u> :–

- जागतिकीकरणामुळे भारतात नविन राजकीय आकृतीबंध निर्माण झाला आहे. त्यांचा प्रत्यक्ष प्रभाव महिलांवर पडला आहे.
- संविधानातील 73 व्या आणि 74 व्या दुरूस्तीमुळे स्थानिक स्वयं शासन संस्थेत महिलांना 33 % आरक्षण मिळाले परिणामी मोठ्या प्रमाणात ग्रामीण आणि शहरी महिलांचा राजकारणात प्रवेश झाले आहे.
- त्यांच्यात राजकीय जागरूकता निर्माण होऊन त्या राजकारणाला समजू लागल्या आहे. आपल्या मताचे महत्व त्यांना कळू लागले आहे, बिहार मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत त्यांनी हे दर्शविले आहे.
- राजकारणासंबंधी निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात वाढली आहे. विशेशतः शहरी भागात निवडणुकीत प्रचार, प्रसार, राजकीय कार्यक्रम, राजकीय आंदोलने, प्रदर्शन या सारख्या गोष्टीत त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.
- अनेक प्रकारचे महिला संगठन आज अस्तित्वात आले आहे हे संगठन आपल्या अधिकारासाठी जागृत असल्याचे दिसत आहे.
- राजकीय क्षेत्रातील अनेक पदांवर महिला सक्षमपणे कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. राजकारणात त्यांची छाप (image) पुरूषांपेक्षा चांगली आहे.

<u>निष्कर्ष</u> :–

भारतात 1991 नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला ही प्रक्रिया आर्थिक असली तरी तिचा प्रभाव भारतीय समाज जीवनाच्या सर्वच अंगावर पडला आहे हा प्रभाव नागरी आणि महानगरी क्षेत्रात अपेक्षाकृत जास्त आहे. जागतिकीकरणामुळे भारतीयांना नवीन जगातील बदलती सामाजिक संरचना व आधुनिक मुल्याचा परिचय झाल्यामुळे त्यांच्यात स्त्रियांसाठी नविन मानवतावादी, उदार व व्यापक दृष्टिकोन निर्माण झाला. परिणामी स्त्रियांना आपल्या विकासासाठी भरपूर संधी उपलब्ध झाल्या. तसेच त्यांच्यासाठी एक सकारात्मक वातावरण संपूर्ण

समाजात निमार्ण झाले. आज महिला या परिस्थितीचा लाभ घेवून आपल्या गुण, कौशल्य, क्षमतेच्या आधारावर स्वतःला स्थापित करीत आहेत व पुरूषांच्या बरोबरीत येत आहेत ही बाब सर्वात महत्वाची आहे. त्याच बरोबर अनेक समस्याही त्यांच्या विकासासोबत निर्माण झाल्या आहेत. येणाऱ्या काळात बळकट होऊन स्त्रिया निश्चितच आणखी समोर येईल असे जागतिकीकरणचे चित्र दिसत आहे.

संदर्भ :—


1. Beneria Laurdes (2003) Gender, Develpment and Globalization Economics.
2. डॉ. स्वाती कर्वे — स्त्री विकासाच्या पाऊल खूणा — प्रतिभा प्रकाशन, पुणे.
3. डॉ. डोळे ना. य. — उदारीकरणः नवे आर्थिक धोरण 1997 — विद्या प्रकाशन नागपूर.
4. डॉ. शुभांगी गोटे गव्हाणे, महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद पब्लीकेशन, औरंगाबाद.
5. देवळणकर डॉ. शैलेंद्र — समकालीन जागतिक राजकारण—2005 विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.